दि.कि.अ. 49/2025

# CHALLAN
## MTR Form Number-6

| | | | |
|---|---|---|---|
| **GRN** MH000338231202627U | **BARCODE** | **Date** 07/04/2026-15:18:00 | **Form ID** |

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** | District And Sessions Court | **Payer Details** | |
| **Type of Payment** | Service and Service Fees<br>Court fees realised in cash including Amin and Pro | **TAX ID (Case No.)** | DSCTAX01 |
| | | **PAN No.(If Applicable)** | |
| **Office Name** | CIVIL COURT JR DIVISION PANHALA | **Full Name** | Anita Anandrao Gaikwad etc 4 |
| **Location** | KOLHAPUR | | |
| **Year** | 2026-2027 One Time | **Flat/Block No.** | |
| **Account Head Details** | **Amount In Rs.** | **Premises/Building** | |
| 0070028801 Court Fee | 200.00 | **Road/Street** | |
| | | **Area/Locality** | |
| | | **Town/City/District** | |
| | | PIN | |
| | | **Remarks (Party Details)** | |
| | | MHKO17 | |
| | | **Amount In Words** | Two Hundred Rupees Only |
| **Total** | 200.00 | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Payment Details** | STATE BANK OF INDIA | **FOR USE IN RECEIVING BANK** | | |
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 00040572026040781572 CPAGOMXBL4 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 07/04/2026-15:24:18 Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | STATE BANK OF INDIA |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll |

Department ID : CMHKO172026331267L

Mobile No. : XXXXXX3940



Print Date 07-04-2026 03:18:48

# CHALLAN
## MTR Form Number-6

| GRN | MH000338231202627U | BARCODE | | Date | 07/04/2026-15:18:00 | Form ID | |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** | District And Sessions Court | **Payer Details** | |
| **Type of Payment** | Service and Service Fees<br>Court fees realised in cash including Amin and Pro | **TAX ID (Case No.)** | DSCTAX01 |
| | | **PAN No.(If Applicable)** | |
| **Office Name** | CIVIL COURT JR DIVISION PANHALA | **Full Name** | Anita Anandrao Gaikwad etc 4 |
| **Location** | KOLHAPUR | | |
| **Year** | 2026-2027 One Time | **Flat/Block No.** | |
| | | **Premises/Building** | |
| | | **Road/Street** | |
| | | **Area/Locality** | |
| | | **Town/City/District** | |
| | | PIN | |
| | | **Remarks (Party Details)** | MHKO17 |
| | | **Amount In Words** | Two Hundred Rupees Only |

| **Account Head Details** | **Amount In Rs.** |
|---|---|
| 0070028801 Court Fee | 200.00 |
| **Total** | 200.00 |

DEFACED ₹200.00 DEFACED

| **Payment Details** | STATE BANK OF INDIA | **FOR USE IN RECEIVING BANK** | | |
|---|---|---|---|---|
| **Cheque-DD Details** | | Bank CIN Ref. No. | 00040572026040781572 | CPAGOMXBL4 |
| Cheque/DD No. | | Bank Date RBI Date | 07/04/2026-15:24:18 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | STATE BANK OF INDIA | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | Not Verified with Scroll | |

Department ID : CMHKO172026331267L Mobile No. : XXXXXX3940

Challan Defaced Details

| Sr. No. | Remarks | Defacement No. | Defacement Date | UserId | Defacement Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | 0000185471202627 | 07/04/2026-15:31:37 | DSC115 | 200.00 |
| | | | **Total Defacement Amount** | | **200.00** |



**Print Date 07-04-2026 03:31:40**

टीप - कोर्ट फी स्टॅंप रु.२००/- जोडला आहे.　　　　　　अर्जदार तर्फे वकील अॅड. पी.के.पाटील

वारसा प्रमाणपत्र

किरकोळ दिवाणी अर्ज नं. ४९/२०२५
नि.नं. १८/बी

१) अनिता आनंदराव गायकवाड
व.व. ७२, धंदा, घरकाम,
रा. पन्हाळा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
२) चंद्रकांत आनंदराव गायकवाड
व.व. ४५, धंदा, नोकरी,
रा. पन्हाळा, ता. पन्हाळा, जि, कोल्हापूर
सध्या रा. शिंगणापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर　　　　....... अर्जदार
३) स्वप्नाली संदिप मयेकर
व.व. ५३, धदा, घरकाम,
रा. सावंत कॉलनी, १ ली गल्ली, शिरोली (पु)
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
४) माधुरी संजय पोवार
व.व. ४९, धंदा. घरकाम,
रा. ताराराणी मार्केट पन्हाळा
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
५) आशा बाळकृष्ण पाटील
व.व, ४५, धंदा-घरकाम,
रा. कणेरीवाडी, १७०/ बी, माळवाडी,
गोकुळ शिरगाव, कोल्हापूर

विरुध्द

१. कोणीही नाही　　　　......... वि.प.

बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ (VIII) चे कलम २
प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठी अर्ज.

( के.दि.काकतकर )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर पन्हाळा

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या न्यायालयाकडे दि. २७/११/२०२५ इ. रोजी अर्ज दाखल करून यातील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ५ यांचे वडील अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड हे दि.०८/१२/१९९८ इ. रोजी पन्हाळा, ता. पन्हाळा येथून मिसिंग झालेले असून (दिवाणी मृत्यू झालेने) त्यांचे अर्जदार हे वारस आहेत असे वारसा प्रमाणपत्र मिळणे हा या अर्जाचा विषय आहे. अर्जदार हे पन्हाळा, ता. पन्हाळा येथील रहिवाशी असून त्यांची पन्हाळा व देवाळे, ता. पन्हाळा त्या ठिकाणी त्यांची वडीलार्जित मालकीची स्थावर व जंगम मालमत्ता आहे. यातील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ५ यांचे वडील अनंत उर्फ आनंदराव शंकरराव

गायकवाड हे दि.०८/१२/१९९८ इ. रोजी पन्हाळा, ता.पन्हाळा येथून राहते घरातून पाहुण्यांचे गावी जातो असे सांगून निघुन गेलेले आहेत. अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ५ यांचे वडील पन्हाळा, ता.पन्हाळा येथून घरातून कोणालाही न सांगता निघून गेलेने त्यांचे घरचे लोकांनी पै-पाहुणे, नातेवाईक यांचेकडे शोध घेतला तसेच ते घरी परत येतील याची खात्री असलेने थोडे दिवस त्यांची घरी येणेची वाट पाहिली परंतु ते घरी आले नाहीत म्हणून अर्जदार यांनी दि.१३/०७/१९९९ इ.रोजी पन्हाळा पोलीस स्टेशन येथे अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड हे मिसिंग झालेबाबत तक्रार दाखल केलेली होती त्याचा पन्हाळा पोलीस स्टेशन कडील मिसिंग रजि. नं.३/१९९९ असा आहे. अर्जदार यांचे पुर्वहक्कदार हे दि.०८/१२/१९९८ इ. रोजी राहते घरातून निघून गेलेनंतर ते आजतागायत परत आलेले नाहीत. तसेच त्यांना आज अखेर गेली २७ वर्षात ज्यांनी पहायला पहिजे अशा कोणीही व्यक्तींनी त्यांना पाहिलेले नाही अथवा त्यांचेबाबत हयात असलेचे कोणीही ऐकलेले नाही. याकारणास्तव त्यांचा दिवाणी मृत्यु झालेला आहे असे अनुमान काढणे आवश्यक आहे.

अर्जदार यांचे पुर्वहक्कदार अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड यांना अर्जदार हेच हिंदू वारसा कायदयातील तरतुदीनुसार वर्ग १ मधील सरळ व कायदेशीर वारस असून त्यांची आई पार्वती शंकरराव गायकवाड यासुध्दा मयत आहेत. याकारणास्तव मयतास या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांचे पुर्वहक्कदार अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड मिसिंग असलेने त्यांचा गेली ७ वर्षापेक्षा अधिक काळ कोठेही ठावठिकाणा उपलब्ध झालेला नाही तसेच त्यांचे हयातीबाबत कोणताही पुरावा उपलब्ध नाही अथवा ज्यांनी पहायला अथवा ज्यांना दिसायला पाहिजे अशा व्यक्तींना ते दिसलेले नाहीत याकारणास्तव त्यांचा दिवाणी मृत्यु झालेला आहे असे गृहित धरुन अर्जदार हे त्यांचे वारस आहेत असे जाहिर करणे न्यायाचे व गरजेचे आहे. अर्जदार यांचे पूर्वहक्कदार अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड हे भारतीय सैन्य दलामध्ये नोकरी करत होते तसेच त्यांचे नावे देवाळे, ता.पन्हाळा, जि, कोल्हापूर याठिकाणी खाते नं. २४८ गट नं. ३७८, ३८२, ३८३ या ७/१२ पत्रकी शेतजमीन मिळकती आहेत परंतू अद्याप मयताचे नोकरीचे ठिकाणी अथवा जमिन मिळकतीस वारस नोंद झालेली नाही. अर्जदार यांचे पुर्वहक्कदार अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड हे मिसिंग झालेने तसेच गेली ७ वर्षापेक्षा अधिक काळ ते परागंदा असलेने त्यांचे मृत्युची नोंद शासकीय दप्तरी होवू शकत नाही याकारणास्तव अर्जदार यांना वारस नोंदी करणे अडचणीचे झाले आहे. अर्जदार यांनी अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड यांचे नोकरीचे ठिकाणी व जमिन मिळकतीस वारस नोंदीबाबत चौकशी केली असता त्यांनी अर्जदार यांना दि.०६/११/२०२५ ई. रोजी वारसा प्रमाणपत्राची मागणी केली म्हणून सदरचा अर्ज दाखल करणेस कारण घडलेले आहे.

सदरच्या अर्जाबाबत मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अर्जदार यांनी दि.१०/१२/२०२५ इ. रोजी दैनिक नवसंदेश, कोल्हापूर मध्ये वर्तमानपत्रात जाहिरनामा प्रसिध्द केलेला आहे. तसेच त्याच्या प्रती १.मयत कै. अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड रा. पन्हाळा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. यांचे घराचे दारावर

२. गाव चावडी / ग्रामपंचायत पन्हाळा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचे नोटीस बोर्डावर .

३. व न्यायालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आल्या. तथापि त्या जाहिरनाम्याच्या व वर्तमानपत्रातील नोटीसच्या अनुषंगाने कोणीही हरकत अथवा तक्रार दाखल केलेली नाही.

म्हणून कै. अनंत उर्फ आनंदराव शंकरराव गायकवाड यांना अर्जदार हेच सरळ व कायदेशीर वारस असलेचे तसेच भारतीय पुरावा कायदा क.१०८ नूसार शाबित झालेवरुन दि.१८/०३/२०२६ इ. रोजीचे आदेशानूसार सदरचा वारसा दाखला अर्जदार यांना देणेत येत आहे.

अर्जदार यांनी सदर प्रमाणपत्राकरीता आवश्यक असणारा न्यायालयीन शुल्काचा मुद्रांक रु.२००/- जमा केला आहे.

सदर कामी मा.न्यायालयाने पुढीलप्रमाणे आदेश केला आहे.

## आदेश

१. अर्जदार क्र. १ ते ५ यांचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम ८ (२) अन्वये अर्जदार क्र.१ ते ५ यांचे नावे वारस दाखला देणेत यावा.

३. बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ तसेच दिवाणी नियमावली परिच्छेद क्र.३१२ अन्वये वारस दाखले मध्ये तशी टीप ठेवण्यात यावी.

CIVIL JUDGE ... PANHALA

दि.१८/०३/२०२६

18/3/26

( के.दि.काकतकर )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर पन्हाळा

आज दि.०७ माहे एप्रिल सन २०२६ इ. राजी माझे सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
दिवाणी नियमावलीच्या क्र. १४ च्या परिच्छेद क्र. ३१२ व ३१३ नुसार तळटीप

या प्रमाणपत्राआधारे मिळालेल्या अथवा ताब्यात आलेली मिळकतींची खरी आणि सविस्तर माहिती प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासून सहा महिन्याच्या आत अथवा मुदतवाढ मिळाल्याच्या तारखेपर्यंत अर्जदारांनी न्यायालयात दाखल करणे आवश्यक आहे. तसेच या प्रमाणपत्राच्या आधारे मिळालेल्या अथवा ताब्यात आलेल्या मिळकतींचा कशा पध्दतीने वापर करण्यात आला अथवा विल्हेवाट लावण्यात आली याबाबतची माहिती देखील प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासून एक वर्षाच्या आत अथवा मुदतवाढ मिळाल्याच्या तारखेपर्यंत अर्जदाराने न्यायालयात दाखल करणे आवश्यक आहे. अशी कोणतीही माहिती न्यायालयास सादर न केल्यास अर्जदार भारतीय दंड विधानाच्या कलम १७६ अन्वये व भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५ मधील कलम ३१७,३९० नुसार कार्यवाहीस पात्र राहील.